
दादा भगवान कथित
मानवधर्म
ज्यामुळे मला दुःख होते, तसे दुःख मी कोणालाही देणार नाही.
Marathi

दादा भगवान कथित

# मानव धर्म

मूल गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

मराठी अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : अजीत सी. पटेल
दादा भगवान विज्ञान फाउंडेशन
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर,
नवरंगपुरा, अहमदाबाद - 380009,
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2100

© Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College,
Usmanpura, Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**Email :** info@dadabhagwan.org
**Tel :** + 91 79 3500 2100

**All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.**

**प्रथम आवृत्ती** : 3,000 ऑक्टोबर 2016

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 10 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
B-99, इलेक्ट्रॉनिक्स GIDC,
क-6 रोड, सेक्टर-25,
गांधीनगर-382044.
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2142

**ISBN/eISBN** : 978-93-86321-02-2

Printed in India

## त्रिमंत्र





नमो अरिहंताणं
नमो सिद्धाणं
नमो आयरियाणं
नमो उवज्झायाणं
नमो लोए सव्वसाहूणं
एसो पंच नमुक्कारो
सव्व पावप्पणासणो
मंगलाणं च सव्वेसिं
पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥
ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥
ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥
जय सच्चिदानंद





# दादा भगवान कोण ?

जून १९५८ संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण ? भगवंत कोण ? जग कोण चालवत आहे ? कर्म म्हणजे काय ? मुक्ती कशाला म्हणतात ? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षूनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण ?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोक'चे नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वत:च्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञानासंबंधित जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषयांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्‌भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये असे विशेष ध्यान ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रुटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण दिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

# आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

मी तर, काही लोकांना माझ्या हातून सिद्धी प्रदान करणार आहे. नंतर कोणी अनुगामी हवा की नको! नंतर लोकांना मार्ग तर हवाच ना?

**- दादाश्री**

परम पूज्य दादाश्री गावोगावी, देश-विदेश परिभ्रमण करून मुमुक्षूंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित होते. दादाश्रींनी आपल्या हयातीतच पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षूंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत. पूज्य दीपकभाई देसाई यांना दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. पू. नीरूमांच्या उपस्थितीतच त्यांच्याच आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात कित्येक ठिकाणी जाऊन मुमुक्षूंना आत्मज्ञान प्राप्ती करवित असत, हे कार्य नीरूमांच्या देहविलयानंतर आजसुद्धा चालूच आहे. या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षू या संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

पुस्तकात मुद्रित वाणी मोक्षार्थीला मार्गदर्शनासाठी अत्यंत उपयोगी सिद्ध होईल, परंतु मोक्षप्राप्तीसाठी आत्मज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे. अक्रम मार्गाने आत्मज्ञानप्राप्तीचा मार्ग आजसुद्धा चालूच आहे. जसा प्रज्वलित दिवाच दुसऱ्या दिव्याला प्रज्वलित करू शकतो, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष आत्मज्ञानींकडून आत्मज्ञान प्राप्त करूनच स्वत:चा आत्मा जागृत होऊ शकतो.

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तकें

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं)
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात (सं)
24. पैशांचा व्यवहार (सं)
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा
30. आप्तवाणी-1, 2, 3

# हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1, 2)
56. ज्ञानी पुरुष (भाग-1)

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

**★ दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

**★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

# संपादकीय

मनुष्य जीवन तर सर्वच जगत आहेत. जन्म झाला, शिकलो, नोकरी केली, लग्न केले, बाप बनलो, आजोबा बनलो आणि मग तिरडीत गेलो. जीवनाचा हाच क्रम आहे का? अशा जगण्याला अर्थ काय? जन्म का घ्यावा लागतो? जीवनात काय प्राप्त करायचे आहे? मनुष्यदेह प्राप्त झाला म्हणून स्वत: मानव धर्मातच राहिले पाहिजे. मानवतेसहित असायला पाहिजे, तेव्हाच जीवन धन्य झाले असे म्हणता येईल.

मानवतेची व्याख्या स्वत:वरूनच नक्की करायची आहे. मला कोणी दु:ख दिले तर मला आवडत नाही, म्हणून मी कोणाला दु:ख देऊ नये, ज्याला हा सिद्धांत जीवनातील प्रत्येक व्यवहारात फिट झाला त्याच्यात पूर्ण मानवता आली.

मनुष्यपण चार गतींचे जंक्शन (केन्द्रस्थान) आहे. तिथून चारी गतींमध्ये जाण्याची सूट आहे. परंतु ज्या प्रकारची कर्मे केली असतील त्या गतीत जावे लागते. मानवधर्मात राहिले तर पुन्हा मनुष्य जन्मात येतील आणि जर मानवधर्मापासून विचलीत झाले तर जनावरात जन्म होईल. मानवधर्माहून पुढे सुपर ह्युमन (दैवी गुण असलेला मनुष्य)च्या धर्मात आला आणि संपूर्ण जीवन परोपकार करण्यात व्यतीत केले, तर देवगतीत जन्म होईल, आणि जर मनुष्य जन्मात आत्मज्ञानींकडून आत्मधर्म प्राप्त करून घेतला तर थेट मोक्षगती-परमपद प्राप्त करू शकेल.

परम पूज्य दादाश्रींनी तर मनुष्याला स्वत:च्या मानवधर्मात प्रगती करता येईल यासाठी सुंदर समज सत्संगाद्वारे प्राप्त करवून दिली आहे. जी सर्व प्रस्तुत संकलनात शब्दरूपात आली आहे, ही समज जर आजच्या मुलांपर्यंत तसेच तरुणांपर्यंत पोहोचली तर जीवनाच्या सुरुवातीपासूनच ते मानवधर्मात येतील आणि तेव्हा हा मनुष्य जन्म सार्थक होऊन धन्य बनेल, हीच अभ्यर्थना!

– **डॉ. नीरूबहन अमीन**

# मानव धर्म

## मानवतेचे ध्येय

**प्रश्नकर्ता :** मनुष्य जीवनाचे ध्येय काय आहे?

**दादाश्री :** मानवतेचे पन्नास टक्के मार्क्स (गुण) मिळाले पाहिजेत. जो मानव धर्म आहे त्यात पन्नास टक्के मार्क्स तर मिळाले पाहिजेत, हे मनुष्य जीवनाचे ध्येय आहे आणि जर उच्च ध्येय ठेवत असाल तर नव्वद टक्के मार्क्स मिळाले पाहिजेत. मानवतेचे गुण तर असायला हवेतच ना? जर मानवताच नसेल तर मनुष्य जीवनाचे ध्येयच कुठे उरले?

इथे तर सर्व 'लाइफ फ्रॅक्चर' (जीवन खंडित) झाले आहे. कशासाठी जगत आहोत याची सुद्धा समज नाही. मनुष्य जन्माचे सार काय? तर ज्या गतीमध्ये जायचे असेल ती गती मिळविणे किंवा मोक्ष हवा असेल तर मोक्ष मिळविणे.

## हे संत समागमामुळे येते

**प्रश्नकर्ता :** मनुष्याचे जे ध्येय आहे ते प्राप्त करण्यासाठी काय करणे अनिवार्य आहे व किती काळापर्यंत?

**दादाश्री :** मानवतेमध्ये कोणकोणते गुण आहेत आणि ते कसे प्राप्त करायचे हे सर्व जाणून घेतले पाहिजे. मानवतेच्या गुणांनी जे संपन्न आहेत असे संत पुरुष असतील त्यांच्याजवळ जाऊन तुम्ही बसले पाहिजे.

# हा आहे खरा मानव धर्म

सध्या तुम्ही कोणत्या धर्माचे पालन करता?

**प्रश्नकर्ता :** मानव धर्माचे पालन करतो.

**दादाश्री :** मानव धर्म कशाला म्हणतात?

**प्रश्नकर्ता :** बस, शांती!

**दादाश्री :** नाही. शांती तर मानव धर्माचे पालन केल्यामुळे मिळणारे फळ आहे. परंतु मानव धर्म म्हणजे नक्की तुम्ही काय पालन करता?

**प्रश्नकर्ता :** पालन करण्यासारखे काहीच नाही. कोणतीही सांप्रदायिकता ठेवायची नाही, बस. जातीभेद ठेवायचा नाही तो मानव धर्म.

**दादाश्री :** नाही, तो मानव धर्म नाही.

**प्रश्नकर्ता :** तर मग मानव धर्म काय आहे?

**दादाश्री :** मानव धर्म म्हणजे काय, यावर थोडेफार बोलूया. पूर्ण बाब तर खूप मोठी आहे पण आपण थोडेसे बोलू या. थोडक्यात सांगायचे तर कोणत्याही मनुष्याला आपल्या निमित्ताने दु:ख होऊ नये. इतर सर्व जीवांची गोष्ट तर सोडून द्या, पण फक्त माणसांना 'आपल्या निमित्ताने दु:ख होणार नाही' एवढे जरी सांभाळले तरी तो मानव धर्म आहे.

वस्तुत: मानव धर्म कशास म्हणणार? जर तुम्ही मालक आहात आणि नोकराला खूप धमकावत असाल तर त्यावेळी तुम्हाला असा विचार आला पाहिजे की, 'जर मी नोकर असतो तर काय झाले असते?' एवढा विचार आला तर मग तुम्ही मर्यादेत राहून धमकावाल. त्याला जास्त बोलणार नाही. जेव्हा तुम्ही कोणाचे नुकसान करता तर तेव्हा

तुम्हाला असा विचार यायला हवा की 'मी समोरच्याचे नुकसान करत आहे, पण कोणी जर माझे नुकसान केले तर काय होईल?'

मानव धर्म म्हणजे स्वतःला जे आवडते ते दुसऱ्यांना देणे आणि स्वतःला जे आवडत नाही ते दुसऱ्यांना न देणे. आपल्याला कोणी थोबाडीत मारलेले आवडत नाही तर आपण दुसऱ्यांच्या थोबाडीत मारू नये. कोणी आपल्याला शिवी दिली ते आपल्याला आवडत नाही, मग आपण सुद्धा कोणाला शिवी देऊ नये. मानव धर्म म्हणजे स्वतःला जे आवडत नाही ते दुसऱ्यांसोबत न करणे. स्वतःला जसे आवडते तसेच दुसऱ्यांसोबत वागणे याचे नाव मानव धर्म, असे लक्षात राहते की नाही? कोणाला त्रास देतोस का? नाही, तर मग चांगले आहे.

'माझ्यामुळे कुणालाही त्रास होऊ नये,' असे राहिले तर कामच झाले ना!

## रस्त्यात पैसे सापडले तर.....

कोणाचे पंधरा हजार रुपये, शंभर-शंभर रुपयांच्या नोटांचे एक बंडल आपल्याला रस्त्यात सापडले, त्यावेळी आपल्या मनात असा विचार आला पाहिजे की, 'माझे एवढे पैसे हरवले तर मला किती दुःख होईल? तर ज्याचे हे पैसे असतील त्याला किती दुःख होत असेल?' म्हणून आपण वर्तमानपत्रात जाहिरात दिली पाहिजे की या जाहिरातीचा खर्च देऊन, पुरावा दाखवून स्वतःचे बंडल घेऊन जावे. बस, अशा प्रकारे मानवतेला समजून घ्या. कारण जसे आपल्याला दुःख होते तसेच समोरच्याला सुद्धा दुःख होत असेल असे तर आपण समजू शकतो ना? प्रत्येक बाबतीत अशा प्रकारचे विचार स्वतःला आले पाहिजेत. परंतु आजकाल तर अशी मानवता विस्मृत होत चालली आहे, हरवूनच गेली आहे, त्यामुळेच ही सर्व दुःखे आहेत. लोक तर केवळ स्वतःचा स्वार्थच बघत आहेत, त्याला मानवता म्हणता येणार नाही.

आजकाल तर लोक असे समजतात की 'जे सापडले ते फुकटचेच आहे ना!' अरे भाऊ, मग तुझे काही हरवले तर ते सुद्धा दुसऱ्यांसाठी फुकटच असेल ना?

**प्रश्नकर्ता :** पण मला हे जे पैसे सापडले ते माझ्याजवळ न ठेवता गरिबांमध्ये वाटून टाकले तर?

**दादाश्री :** नाही, गरिबांमध्ये नाही. ते पैसे त्याच्या मालकापर्यंत कसे पोहोचवता येतील त्याचा शोध घेऊन आणि त्यासाठी जाहिरात देऊन त्याला परत कर. तरीसुद्धा त्या माणसाचा ठाव-ठिकाणा लागला नाही, तो जर परदेशातला असेल तरच आपण त्या पैशांचा उपयोग कोणत्याही चांगल्या कार्यासाठी करायला हरकत नाही, परंतु स्वतःजवळ ठेवू नये.

आणि जर तुम्ही कोणाचे पैसे परत केले असतील तर तुम्हालाही परत करणारे भेटतील. तुम्हीच परत केले नाहीत तर मग तुमचे परत कसे मिळतील? तात्पर्य, आपल्याला स्वतःची समज बदलायला हवी. असे तर नाही चालत ना? याला मार्ग म्हणता येणारच नाही ना? एवढे पैसे कमावता तरीही सुखी नाही, असे का?

समजा आता तुम्ही कोणाकडून दोन हजार रुपये आणले आणि ते परत करण्याची सोय होत नसेल तेव्हा जर मनात असे भाव आले की, 'आता मी त्याला कसे परत करणार? त्याला नकार देऊ या' असा भाव आल्यावर लगेचच मनात विचार आला पाहिजे की जर माझ्याकडून कोणी घेऊन गेला आणि त्याने असा भाव केला तर माझी काय स्थिती होईल? अर्थात स्वतःचे भाव बिघडणार नाहीत असे आपण वागू तोच मानव धर्म आहे.

कोणालाही दुःख होऊ नये हे सर्वात मोठे ज्ञान आहे. एवढे मात्र सांभाळा. जरी कंदमूळ खात नसाल परंतु माणुसकीचे पालन करता येत

नसेल तर ते व्यर्थ आहे. असे तर लोकांना ओरबाडून खाणारे अनेक आहेत, जे पशू योनीत गेले आहेत आणि अजूनपर्यंत परतले नाहीत. हे सर्व तर नियमाने चालत आहे, ही अंधेर नगरी नाही. येथे थापेबाजी चालत नाही. थोतांड चालत नाही, हे जग नियमाने चालत असेल की असेच सारे थोतांड असेल?

**प्रश्नकर्ता :** नियमानेच चालत असेल.

**दादाश्री :** हो, नियमानेच चालते. थोतांड नाही. तुम्हाला समजले? 'मला जेवढे दुःख होते तेवढे त्याला होणार की नाही?' ज्यांना असा विचार येतो ते सर्व मानव धर्मात आहेत, नाहीतर मानव धर्मच कसा म्हणणार?

## उधार घेतलेले पैसे परत केले नाही तर?

आपल्याला कुणी दहा हजार रुपये दिले असतील आणि जर आपण त्याला परत केले नाही, तर त्याचक्षणी आपल्या मनात विचार यायला हवा की, 'जर मी कोणाला पैसे दिले असतील आणि त्याने परत केले नाही तर मला किती दुःख होईल? म्हणूनच शक्य तेवढ्या लवकर त्याला परत करावे,' स्वतःजवळ ठेवू नये. मानव धर्म म्हणजे काय? जसे आपल्याला दुःख होते तसेच समोरच्यालाही दुःख होतेच. तरीसुद्धा मानव धर्म प्रत्येकाचा वेगवेगळा असतो. ज्याची जशी डेव्हलपमेंट (आंतरिक विकास) असेल त्याप्रमाणे त्याचा मानव धर्म असतो. मानव धर्म एकाच प्रकारचा नसतो.

कोणाला दुःख देतेवेळी स्वतःच्या मनाला असे वाटते की 'मला दुःख दिले तर काय होईल?' म्हणजे मग दुःख देणे बंद होते. हीच मानवता आहे.

## पाहुणे घरी येतात तेव्हा....

आपण कुणाच्या घरी पाहुणे बनून गेल्यास आपण यजमानाचा

विचार केला पाहिजे की जर आपल्या घरात पंधरा दिवसांसाठी पाहुणे आले तर काय होईल? म्हणूनच यजमानावर ओझे बनू नये. दोन दिवस तिथे राहिल्यानंतर काही तरी बहाणा बनवून हॉटेलात निघून जावे.

लोक आपल्या स्वतःच्याच सुखात मग्न आहेत. दुसऱ्यांच्या सुखात माझे सुख आहे ही बाब विसरत चालले आहेत. 'दुसऱ्यांच्या सुखात मी सुखी आहे' असे मानणे आता बंद झालेले आहे आणि स्वतःच्या सुखातच मग्न आहेत की मला चहा मिळाला ना, बस!

तुम्हाला दुसरे काहीच लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही. 'कंदमूळ खाऊ नये' हे माहीत नसले तरी चालेल पण एवढे जाणून घेतले तरी खूप झाले की तुम्हाला जे दुःख होत आहे तसे दुःख कोणालाही देऊ नये. अशा प्रकारे वागणे, त्याला मानव धर्म म्हणतात. फक्त एवढाच धर्म पाळला तरी पुष्कळ झाले. आता या घोर कलियुगात जे मानव धर्माचे पालन करतात त्या सर्वांवर मोक्षाचा शिक्का लावावा लागतो. परंतु सत्युगात फक्त मानव धर्माचे पालन करणे पुरेसे नव्हते. हे तर सध्या या काळात कमी मार्क्स असूनही पास करावे लागते. मी काय सांगू इच्छितो ते तुम्हाला समजले का? कशात पाप आहे आणि कशात पाप नाही, हे तुम्ही समजून घ्या.

## इतरत्र वाईट नजर, तिथे मानव धर्म चुकला

याच्या पुढचा मानव धर्म म्हणजे काय? तर एखाद्या स्त्रीकडे बघून आकर्षण झाले तर लगेचच विचार यायला हवा की जर माझ्या बहिणीकडे कुणी अशा वाईट नजरेने बघितले तर काय होईल? मला दुःख होईल. असा विचार करील तोच मानव धर्मी. म्हणूनच, 'मला कोणत्याही स्त्रीकडे वाईट नजरेने पाहाता कामा नये' असा पश्चाताप करील, अशी त्याची डेव्हलपमेंट असायला पाहिजे ना?

मानवता म्हणजे काय? स्वतःच्या पत्नीला कुणी वाईट नजरेने

पाहिले तर स्वत:ला ते आवडत नाही, तर त्याच प्रमाणे तोसुद्धा दुसऱ्यांच्या पत्नीला वाईट नजरेने पाहणार नाही. स्वत:च्या मुलीवर कोणी वाईट नजर केली तर स्वत:ला आवडत नाही म्हणून तो ही दुसऱ्यांच्या मुलींला वाईट नजरेने पाहत नाही. कारण ही गोष्ट नेहमीच लक्षात असली पाहिजे की जर मी दुसऱ्यांच्या मुलींवर वाईट नजर केली तर कोणीतरी माझ्या मुलीवर सुद्धा वाईट नजर करणारच. हे लक्षात राहिलेच पाहिजे, तर तो मानव धर्म म्हटला जाईल.

मानव धर्म म्हणजे जे आपल्याला आवडत नाही ते दुसऱ्यांबरोबर कधीही न करणे. मानव धर्म लिमिटेड (सीमित) आहे. लिमिटच्या बाहेर नाही, परंतु तेवढा जरी पाळला तरी खूप आहे.

स्वत:ची पत्नी असेल तर भगवंत सांगतात की, तू लग्न केलेस त्यास जगाने स्वीकारले, तुझ्या सासरच्या लोकांनी स्वीकारले, तुझ्या कुटुंबातील सर्वांनीच स्वीकार केला आहे. पत्नीसोबत सिनेमा बघायला गेलास तर कोणी बोट दाखवणार का? आणि जर परस्त्रीसोबत गेलास तर?

**प्रश्नकर्ता :** अमेरिकेत यावर आक्षेप घेत नाहीत.

**दादाश्री :** अमेरिकेत आक्षेप घेत नाहीत, परंतु हिंदुस्तानात तर आक्षेप घेणार ना? ही गोष्ट खरी आहे, पण तिथल्या लोकांना ही गोष्ट समजत नाही. आपण ज्या देशात जन्म घेतला आहे तिथे अशा व्यवहारावर आक्षेप घेतला जातो आणि असे आपत्तीजनक कृत्य हाच गुन्हा आहे.

येथे तर ऐंशी टक्के मनुष्य जनावरगतीत जाणारे आहेत. वर्तमानातील ऐंशी टक्के मनुष्य! कारण मनुष्य जन्म मिळाल्यावरही काय केले? तर भेसळ केली, बिनहक्काचे उपभोगले, लुटले, बिनहक्काचे मिळावे अशी इच्छा केली, असे विचार केले, किंवा परस्त्रीवर नजर बिघडवली. मनुष्याला स्वत:ची पत्नी भोगण्याचा हक्क आहे पण बिनहक्काच्या, परस्त्रीवर नजर बिघडवू नये, त्याचा सुद्धा दंड मिळतो. फक्त नजर

बिघडवली तरीसुद्धा दंड, त्याला जनावरगती मिळते, कारण ती पाशवता म्हटली जाते. खरे तर, मानवता असायला हवी.

मानव धर्म याचा अर्थ काय? हक्काचे उपभोगणे तो मानव धर्म. असे तुम्ही मान्य करता की नाही?

**प्रश्नकर्ता :** बरोबर आहे.

**दादाश्री :** आणि बिनहक्काच्या बाबतीत?

**प्रश्नकर्ता :** स्वीकारता कामा नये. जनावर गतीत जाऊ याचा काही पुरावा आहे?

**दादाश्री :** हो, पुराव्यासोबत आहे. पुराव्याशिवाय अशीच थाप मारू शकत नाही.

मनुष्यत्व कुठपर्यंत राहणार? 'हक्काचे नसलेले किंचितसुद्धा भोगत नाही' तोपर्यंत मनुष्यत्व राहणार. स्वतःच्या हक्काचे भोगेल त्याला मनुष्य जन्म मिळेल, बिन हक्काचे भोगेल तो जनावर गतीत जाईल. स्वतःच्या हक्काचे दुसऱ्याला द्याल तर देवगती मिळेल आणि मारून बिनहक्काचे घ्याल तर नरकगती मिळेल.

## मानवतेचा अर्थ

मानवता म्हणजे 'जे माझे आहे ते मी भोगेन आणि जे तुझे आहे ते तू भोग.' जे माझ्या वाट्याला आले ते माझे आणि जे तुझ्या वाट्याला आले ते तुझे. परक्या वस्तूवर नजर ठेवू नये, हा मानवतेचा अर्थ आहे. मग पाशवता म्हणजे 'माझे ते माझेच आणि जे तुझे ते पण माझे,' ती पाशवता आहे. आणि दैवी गुण कशाला म्हणतात? 'जे तुझे ते तुझेच आणि जे माझे आहे तेही तुझेच.' जे परोपकारी असतात ते स्वतःचे असेल ते पण दुसऱ्यांना देऊन टाकतात. असे दैवी गुणांचेसुद्धा असतात की नाही? आजकाल तुम्हाला अशी मानवता दिसून येते का कुठे?

**प्रश्नकर्ता :** काही ठिकाणी पाहायला मिळते आणि काही ठिकाणी पाहायला सुद्धा मिळत नाही.

**दादाश्री :** एखाद्या माणसामध्ये पाशवता पाहायला मिळते का? जेव्हा तो शिंगे उगारतो तेव्हा आपल्याला नाही का समजणार की हा रेड्यासारखा आहे म्हणूनच शिंगे मारायला येतो. त्यावेळी आपण बाजूला सरकले पाहिजे. असा पशू वृत्तीचा माणूस तर राजालाही सोडत नाही. समोरून राजा येत असेल तरी पण हा म्हशीचा भाऊ मस्तीत चालत असतो, तिथे राजाला बाजूला व्हावे लागते पण तो काही बाजूला होत नाही.

## हा आहे मानवतेपेक्षाही मोठा गुण

या नंतर मानवतेपेक्षाही वरचढ असे 'सुपर ह्यूमन' (दैवी मानव) कोणास म्हणणार? तुम्ही दहा वेळा एखाद्या व्यक्तीचे नुकसान केले तरीसुद्धा जेव्हा तुम्हाला गरज असेल तेव्हा ती व्यक्ती तुमची मदत करते. तुम्ही पुन्हा त्या व्यक्तीचे नुकसान केले तरी पण तुम्हाला गरज असेल त्यावेळी ती व्यक्ती पुन्हा तुम्हाला मदत करते. तिचा स्वभावच मदत करण्याचा असतो. म्हणून आपण समजून घ्यावे की हा मनुष्य 'सुपर ह्यूमन' आहे, यास दैवी गुण म्हणतात, अशी माणसे क्वचितच असतात. आजकाल तर अशी माणसे सापडतच नाहीत. कारण लाखात एखादाच असा असतो, असे याचे प्रमाण झाले आहे.

मानवतेच्या धर्माविरुद्ध कोणत्याही धर्माचे आचरण केले, जर पाशवी धर्माचे आचरण केले, तर पशूमध्ये जातो. जर राक्षसी धर्माचे आचरण केले तर राक्षसीपणात जातो, अर्थात नरकगतीत जातो आणि जर 'सुपर ह्यूमन' या धर्माचे आचरण केले तर देवगतीमध्ये जातो. मी काय सांगू इच्छितो ते तुम्हाला समजले का?

## जे जेवढे जाणतात तेवढा धर्म ते शिकवतात

येथे (भारत भूमीवर) संतपुरुष व ज्ञानीपुरुष जन्म घेतात आणि

ते लोकांचे भले करत असतात. ते स्वत: मुक्त झाले आहेत व अनेकांना मुक्त करतात. स्वत: जसे बनले आहेत तसेच दुसऱ्यांना बनवतात. स्वत: जर मानव धर्म पाळत असतील तर ते मानव धर्म शिकवतात. याहून पुढे जर ते दैवी धर्माचे पालन करत असतील तर ते दैवी धर्म शिकवतात. 'अतिमानव' (सुपर ह्यूमन) चा धर्म जाणत असतील तर अतिमानवतेचा धर्म शिकवतात, म्हणजे जो धर्म ते जाणतात तोच ते शिकवतात आणि जे या सर्व अवलंबनापासून मुक्ततेचे ज्ञान जाणत असतील, स्वत: मुक्त झाले असतील तर ते मुक्तीचे ज्ञानसुद्धा शिकवतात.

## असा आहे पाशवतेचा धर्म

**प्रश्नकर्ता :** खरा धर्म तर मानव धर्म हाच आहे. आता त्यात मुख्यत: हे जाणून घ्यायचे आहे की खरा मानव धर्म म्हणजे 'आपल्याकडून कोणालाही दु:ख होऊ नये' हाच त्याचा सर्वात मोठा पाया आहे. लक्ष्मीचा, सत्तेचा, वैभवाचा या सर्वांचा दुरुपयोग करू नये, त्याचा सदुपयोग करावा. हे सर्व मानव धर्माचे सिद्धांत आहेत अशी माझी समज आहे तर आपल्याकडून जाणू इच्छितो की हे बरोबर आहे?

**दादाश्री :** खरा मानव धर्म हाच आहे की कोणत्याही जीवास किंचितमात्र दु:ख देऊ नये. कोणी आपल्याला दु:ख दिले तर तो पाशवता करत आहे पण आपण पाशवता करू नये, जर माणूस बनून रहायचे असेल तर! आणि मानव धर्माचे उत्तम प्रकारे पालन केले तर मोक्ष प्राप्त होण्यास वेळ लागत नाही. मानव धर्मच जर समजून घेतला तरी पुष्कळ झाले. दुसरा कोणताही धर्म समजण्यासारखा नाही. मानव धर्म म्हणजे पाशवता करू नये, तोच मानव धर्म आहे. आपल्याला कोणी शिवी दिली तर तो पाशवता करतो पण आपण पाशवता करू नये. आपण मनुष्याप्रमाणे समता ठेवावी आणि त्यास विचारावे की, 'भाऊ, माझा काय गुन्हा आहे? तू मला सांग तर मी माझा गुन्हा सुधारीन.' मानव धर्म असा असायला हवा की कोणालाही आपल्याकडून किंचितमात्र

दु:ख होऊ नये. कोणाकडून जर आपल्याला दु:ख झाले तर तो त्याचा पाशवी धर्म आहे. पण त्या बदल्यात आपण पाशवी धर्म करू शकत नाही. पाशवीसोबत पाशवी न होणे हाच मानव धर्म. तुम्हाला समजले का? मानव धर्मात टिट फॉर टॅट (जशास तसे) चालत नाही. कोणी आपल्याला शिवी दिली तर आपणही त्याला शिवी देतो. एखादा मनुष्य आपल्याला मारतो तर आपणही त्याला मारतो मग आपणही पशूच झालो, मानव धर्म राहिलाच कुठे? अर्थात धर्म असा असायला हवा की कोणासही दु:ख होऊ नये.

तसे तर म्हटला जातो माणूस, पण जर माणुसकीच निघून गेलेली असेल तर काय कामाचे? ज्या तिळांत तेलच नाही ते तीळ काय कामाचे? मग त्याला तीळ कसे म्हणणार? त्याची इन्सानियत (माणुसकी) तर निघून गेली आहे. इन्सानियत तर सर्वप्रथम असायला हवी. त्यामुळेच तर सिनेमावाले गातात ना, 'कितना बदल गया इंसान....' तेव्हा मग उरलेच काय? मनुष्य बदलला तर सर्व पुंजीच हरवेल. आता कशाचा व्यापार करशील, मूर्खा?

## अंडरहॅन्डसोबत कर्तव्य निभावताना...

**प्रश्नकर्ता :** आपल्या हाताखाली कोणी काम करणारा असेल, स्वत:चा मुलगा असेल, ऑफिसचा माणूस किंवा इतर कोणीही असेल तो जर स्वत:चे कर्तव्य चुकला तर त्यावेळी आपण त्याला सल्ला देतो त्यामुळे त्याला दु:ख होते. अशा वेळी विरोधाभास उत्पन्न होत आहे असे वाटते, मग तेथे काय करायला पाहिजे?

**दादाश्री :** त्याला काही हरकत नाही. जोपर्यंत तुमची दृष्टी (हेतू) चांगली आहे तोपर्यंत हरकत नाही. परंतु तुमचा पाशवतेचा (दु:ख देण्याचा) हेतू नसावा आणि जर विरोधाभास उत्पन्न झालाच तर आपण त्यांची माफी मागितली पाहिजे. अर्थात झालेली चूक स्वीकारावी. मानव धर्म पूर्ण असायला हवा.

## नोकराकडून नुकसान झाले तर...

लोकांमध्ये मतभेद का होतात?

**प्रश्नकर्ता :** मतभेद होण्याचे कारण स्वार्थ आहे.

**दादाश्री :** स्वार्थ तर त्यास म्हणतात की भांडण करत नाही. स्वार्थात नेहमीच सुख असते.

**प्रश्नकर्ता :** परंतु आध्यात्मिक स्वार्थ असेल तर त्यात सुख असते, पण भौतिक स्वार्थ असेल त्यात दु:खच असते ना?

**दादाश्री :** हो, पण भौतिक स्वार्थ पण ठीक असतो. स्वत:चे सुख जायला नको, कमी व्हायला नको, ते सुख वाढावे असे वागतात. परंतु क्लेश झाल्यामुळे भौतिक सुख निघून जाते. पत्नीच्या हातातून ग्लास पडला व त्यात वीस रुपयाचे नुकसान झाले तर लगेचच मनातल्या मनात घुसमटतो की, 'वीस रुपयांचे नुकसान झाले,' अरे मूर्खा, याला नुकसान म्हणत नाहीत, हा तर तिच्या हातातून पडला. जर तुझ्या हातातून पडला असता तर तू काय न्याय केला असता? त्याचप्रमाणे आपण न्याय करायला पाहिजे. पण तिथे तर आपण असा न्याय करतो की, 'हिने नुकसान केले,' पण ती काय कोणी बाहेरची व्यक्ती आहे का? आणि जरी बाहेरची व्यक्ती असली, नोकर असला ना, तरीही असे वागू नये. कारण काय तर कोणत्या नियमाच्या आधारे ग्लास खाली पडतो, ती पाडते की पडून जातो याचा विचार नको का करायला? नोकर काय मुद्दाम पाडतो?

तेव्हा कोणत्या धर्माचे पालन करावे? कोणीही आपले नुकसान केले, कोणी आपल्याला वैरी दिसत असला तरीही तो खरोखर वैरी नाही. कोणी नुकसान करू शकेल असे नाही, त्यामुळे त्याच्या द्वेष करू नये. मग जरी आपल्या घरच्या माणसांकडून किंवा नोकराकडून ग्लास खाली पडला तरी तो नोकराने नाही पाडला, पाडणारा तर कोणी दुसराच

आहे. त्यामुळे नोकरावर जास्त क्रोध करू नका. शांतपणे बोला की, 'भाऊ, जरा सावकाश चालत जा. तुझा पाय तर भाजला नाही ना?' असे विचारा. आपले दहा-बारा ग्लास फुटल्यामुळे मनात हळहळ, बैचेनी सुरू झालेलीच असते. पाहुणे बसले असतील तोपर्यंत क्रोध करत नाही पण आतल्या आत कुढत राहतो आणि पाहुणे गेल्यानंतर मात्र नोकराला चांगलेच खडसावतो. असे वागण्याची गरज नाही, हा सगळ्यात मोठा गुन्हा आहे. कोण करतो हे जाणत नाही. जग तर डोळ्यांनी जे दिसते त्या निमित्तालाच चावायला धावते.

मी एवढ्या लहान मुलाला म्हटले होते की जा हा कप बाहेर फेकून ये. तर त्याने खांदे उडवून नकार दिला, 'नाही फेकणार,' कोणीही नुकसान करत नाही. एका मुलाला मी सांगितले, 'हे दादांचे बूट आहेत ते बाहेर फेकून ये.' तर त्याने खांदे उडवून नकार दिला. 'नाही फेकायचे' चांगली समज आहे, म्हणजे असे कोणीच फेकत नाही. नोकर सुद्धा तोडत नाही. हे तर मूर्ख लोक, नोकराला हैराण करून टाकतात. अरे, तू जेव्हा नोकर होशील ना तेव्हा तुला बरोबर कळेल. आपण जर असे वागलो नाही तर आपल्यावर जर कधी नोकर होण्याची पाळी आली तर तेव्हा आपल्याला चांगला मालक मिळेल.

स्वत:ला दुसऱ्याच्या जागी ठेवणे त्याचे नाव मानव धर्म. दुसरा धर्म तर अध्यात्म, हा तर याच्याही पुढचा आहे. परंतु एवढा मानव धर्म तरी जमलाच पाहिजे.

## जितके चारित्र्य बळ तितके प्रवर्तन

**प्रश्नकर्ता :** पण ही गोष्ट समजत असून सुद्धा बऱ्याच वेळा आम्ही असे वागत नाही त्याचे कारण काय?

**दादाश्री :** कारण हे ज्ञान कधी जाणलेलेच नाही. खरे ज्ञान माहीतच नाही. जे ज्ञान जाणले ते फक्त पुस्तकांमधून जाणलेले आहे.

परंतु कोणत्याच क्वालिफाईड (योग्य) गुरूकडून जाणून घेतले नाही. क्वालिफाईड गुरू अर्थात ते जे सांगतात ते आम्हाला आत एक्जॅक्ट (यथार्थपणे) परिणमित होत असते. समजा मी स्वत: जर बिडी पीत असेन आणि तुम्हाला सांगितले की 'बिडी सोडून द्या,' तर याचा तुमच्यावर काहीही परिणाम होणार नाही. त्यासाठी तर चारित्र्यबळ पाहिजे. संपूर्ण चारित्र्यबळ असलेले गुरू असतील तरच पालन होऊ शकेल नाहीतर असेच काही पालन होऊ शकणार नाही.

आपण आपल्या मुलाला सांगितले की 'या बाटलीत विष आहे. बघ हे पांढरे दिसते ना, त्याला तू हात लावू नकोस.' तर ते मूल काय विचारते 'पण विष म्हणजे काय?' तेव्हा तुम्ही सांगता की, 'विष म्हणजे ज्यामुळे मृत्यू होतो.' त्यावर तो पुन्हा विचारतो 'मृत्यू होतो म्हणजे काय?' तेव्हा तुम्ही सांगता, ''काल त्या तिथे त्यांना बांधून घेऊन जात होते ना, तू म्हणत होतास, 'नका घेऊन जाऊ, नका घेऊन जाऊ,' तर ते मरून गेले म्हणून त्यांना घेऊन जातात.'' म्हणजे त्याला हे समजल्यानंतर तो बाटलीला हात लावत नाही, ज्ञान समजून घ्यायला हवे.

एकदा सांगितले की 'हे विष आहे' मग हे ज्ञान त्याला हजर राहिलेच पाहिजे आणि जे ज्ञान हजर राहत नसेल ते ज्ञानच नाही ते अज्ञानच आहे. येथून अहमदाबादला जायचे ज्ञान, नकाशा वगैरे सगळे तुम्हाला दिले आणि त्यानंतर त्याप्रमाणे जर अहमदाबाद आलेच नाही तर तो नकाशाच चुकीचा आहे, एक्जॅक्ट यायलाच पाहिजे.

## चार गतीत भटकण्याची कारणे...

**प्रश्नकर्ता :** मनुष्याच्या कर्तव्यासंबंधी आपण काही सांगा.

**दादाश्री :** मनुष्याच्या कर्तव्यामध्ये ज्याला पुन्हा मनुष्यच व्हायचे असेल तर त्याची लिमिट (सीमा) सांगतो. वर चढायचे नसेल अथवा खाली उतरायचे नसेल, वर देवगती आहे आणि खाली जनावरगती आहे

आणि त्यापेक्षाही खाली नरकगती आहे. अशा सर्व गती आहेत. तुम्ही तर मनुष्याच्या बाबतीच विचारत आहात ना?

**प्रश्नकर्ता :** देह आहे तोपर्यंत तर मनुष्य म्हणूनच कर्तव्ये पार पाडावी लागतील ना?

**दादाश्री :** मनुष्याचे कर्तव्य पालन करत आहात म्हणूनच मनुष्य झालात. त्यात आपण उत्तीर्ण झालो, आता कशात उत्तीर्ण व्हायचे आहे? संसार दोन प्रकारचा आहे. एक तर मनुष्य जन्मात आल्यानंतर क्रेडिट जमा करतात तेव्हा उच्च गतीमध्ये जातात. डेबिट जमा करतात तेव्हा खालच्या गतीला जातात आणि जर क्रेडिट-डेबिट दोन्हींचा व्यापार बंद केला तर मुक्ती होते. या पाचही जागा खुल्या आहेत. चार गती आहेत. खूपच क्रेडिट असेल तर देवगती मिळते. क्रेडिट जास्त आणि डेबिट कमी असेल तर मनुष्यगती मिळते. डेबिट जास्त आणि क्रेडिट कमी असेल तर जनावरगती आणि संपूर्णपणे डेबिट तर ती नरकगती या चार गती व पाचवी जी आहे ती मोक्षगती. या चारही गती मनुष्य प्राप्त करू शकतात आणि पाचवी गती तर हिंदुस्तानातील मनुष्यच प्राप्त करू शकतात, 'स्पेशल फॉर इंडिया' (हिंदुस्तानासाठी खास). इतर लोकांसाठी नाही.

आता जर त्याला मनुष्य जन्म पाहिजे असेल तर त्याने वडीलधारी माणसांची, आई-वडिलांची सेवा केली पाहिजे, गुरूची सेवा केली पाहिजे. लोकांसोबत ऑब्लाइजिंग नेचर (परोपकारी स्वभाव) ठेवायला पाहिजे आणि व्यवहार असा करायला पाहिजे की दहा द्या आणि दहा परत घ्या, दहा द्या नी दहा घ्या. अशा प्रकारे व्यवहार शुद्ध ठेवला तर समोरच्याशी काहीच देणेघेणे उरणार नाही. अशा प्रकारे व्यवहार करावा, संपूर्ण शुद्ध व्यवहार. मानवतेत तर कोणाला मारत असताना किंवा कोणाला मारण्यापूर्वीच विचार येतो. मानवता असेल तर हे लक्षात आलेच पाहिजे की, जर मला मारले तर मला कसे वाटेल? असा विचार आधी

आला पाहिजे, तेव्हा मानव धर्म राहू शकेल, नाहीतर राहू शकणार नाही. हे लक्षात ठेवून सर्व व्यवहार केला जाईल तर पुन्हा मनुष्यत्व प्राप्त होईल अन्यथा पुन्हा मनुष्यत्व प्राप्त होणे हे सुद्धा कठीणच आहे.

ज्याला याची जाणीव नाही की याचा परिणाम काय होईल त्याला मनुष्यच म्हणता येणार नाही. उघड्या डोळ्यांनी झोपतो ही अजागृती. त्यास माणूस म्हणू शकत नाही. दिवसभर बिनहक्काचे भोगण्याचेच विचार करत राहतात, भेसळ करतात ते सर्व जनावर गतीमध्ये जातात. येथून, मनुष्यातून सरळ जनावर गतीत जातात आणि मग तिथे (दु:ख) भोगतात.

स्वत:चे सुख दुसऱ्यांना देतो, स्वत:च्या हक्काचे सुख पण दुसऱ्यांना देऊन टाकतो तो सुपर ह्यूमन म्हटला जातो आणि त्यामुळे तो देवगतीत जातो. स्वत:ला जे सुख उपभोगायचे आहे, स्वत:साठी जे सुख निर्माण झालेले आहे, स्वत:ला ज्याची आवश्यकताही आहे तरी पण दुसऱ्यांना देऊन टाकतो तो सुपर ह्यूमन आहे, त्यामुळे तो देवगतीत जातो आणि जो विनाकारण नुकसान करतो, त्याचा स्वत:चा त्यात काहीच फायदा नसतो, तरी समोरच्याचे खूप नुकसान करतो तो नरकगतीत जातो. जे लोक बिनहक्काचे उपभोगतात, ते तर स्वत:च्या फायद्यासाठी उपभोगतात त्यामुळे जनावर गतीत जातात. परंतु जे लोक कोणत्याही कारणाशिवाय लोकांची घरे जाळून टाकतात, दंगल करतात ते सर्व नरकगतीचे अधिकारी आहेत. आणि अनेकांचे जीव घेतात किंवा तलावात विष मिसळतात, विहिरीमध्ये असे काही तरी टाकतात ते सर्वच नरकाचे अधिकारी आहेत. सगळी जबाबदारी स्वत:ची आहे. जगात एका एका केसाइतकी जबाबदारी सुद्धा स्वत:चीच आहे.

निसर्गामध्ये जरा सुद्धा अन्याय नाही. इथे मनुष्यांमध्ये कदाचित अन्याय होऊ शकतो परंतु निसर्ग तर संपूर्ण न्यायस्वरूपच आहे. कधीच अन्याय झालाच नाही. सर्व काही न्यायातच असते व जे काही होत

आहे ते सुद्धा न्यायपूर्णच आहे. असे जर समजले तर ते ज्ञान म्हटले जाते. आणि जे घडत आहे त्यात 'हे चुकीचे घडले, ते चुकीचे घडले, हे बरोबर झाले' असे जे बोलतात त्यास अज्ञान म्हटले जाते. जे घडते ते करेक्टच आहे.

## अंडरहॅन्डसोबतचा मानव धर्म

आपल्यावर कोणी रागावले तर ते सहन होत नाही आणि आपण मात्र दिवसभर दुसऱ्यांवर रागवत राहतो. अरे, ही कसली अक्कल? हा मानव धर्म नाही. स्वतःवर कोणी थोडे जरी रागावले तरी ते सहन होत नाही आणि तोच मनुष्य दिवसभर सर्वांवर रागवत राहतो, कारण ते दबलेले आहेत म्हणूनच ना? दबलेल्यांना मारणे हा तर खूप मोठा अपराध आहे. मारायचे असेल तर *उपरी* (आपले वरिष्ठ, वरचढ) असतील त्यांना मार, भगवंताला किंवा वरिष्ठांना. कारण की ते वरिष्ठ आहेत, शक्तीवंत आहेत. हे अंडरहॅन्ड (कनिष्ट, नोकर वगैरे) तर अशक्त आहेत त्यामुळे त्यांना जीवनभर झिडकारत राहतात. मी तर अंडरहॅन्डला जरी तो कसाही गुन्हेगार असला तरी त्याला वाचवले होते. परंतु *उपरी* कितीही चांगला असला तरी मी ते खपवून घेतले नाही आणि मला कोणाचेही *उपरी* बनायचे नाही. *उपरी* चांगला असेल तर काहीच हरकत नाही पण याचा अर्थ असा नाही की तो नेहमी चांगलाच राहील. तो कधी आपल्याला असे सुनावेल की आपले डोके फिरेल. *उपरी* कोणास म्हणता येईल की जो अंडरहॅन्डला सांभाळतो तो खरा *उपरी.* मी खरा *उपरी* शोधत आहे. माझा *उपरी* बन पण खरा *उपरी* बन! तू मला धमकावावेस यासाठी काय मी जन्म घेतला आहे? असे तू मला काय देणार आहेस.

तुमच्याकडे कोणी नोकरी करत असेल तर त्याला कधीही झिडकारू नका, डिवचू नका, सर्वांना सन्मानपूर्वक वागावा. कोणास ठाऊक कोणत्या माणसाकडून कोणता लाभ होईल?

## प्रत्येक जातीमध्ये मानव धर्म

**दादाश्री :** मनुष्य गतीच्या चौदा लाख योनी, लेयर्स (स्तर) आहेत. परंतु खरोखर मनुष्य जात जर बायॉलॉजिकली (जीवशास्त्राप्रमाणे) बघितली तर कोणत्याही मनुष्यामध्ये कुठलाच फरक दिसून येत नाही. सर्व समानच वाटतात तरी पण असे लक्षात येते की, जरी बायॉलॉजिकली फरक नसेल परंतु जे त्यांचे मानस आहे...

**दादाश्री :** ती डेव्हलेपमेंट (आंतरिक विकास) आहे. त्याचे इतके सर्व भेद आहेत.

**प्रश्नकर्ता :** वेगवेगळे लेयर्स असूनही बायॉलॉजिकली सर्व समानच आहेत तर मग त्यांचा कोणतातरी एक कॉमन धर्म असू शकतो ना?

**दादाश्री :** कॉमन धर्म तर मानव धर्म, तो स्वतःच्या समजुतीनुसार मानव धर्म पाळू शकतो. प्रत्येक जण स्वतःच्या समजुतीनुसार मानव धर्म पाळतो परंतु यथार्थ समजपूर्वक मानव धर्म पाळता आला तर ते सर्वांत उत्तम ठरेल. मानव धर्म तर खूपच हायक्लास (श्रेष्ठ) आहे पण मानव धर्मात येईल तेव्हाच ना? लोकांमध्ये मानव धर्म आहेच कुठे?

मानव धर्म तर खूपच सुंदर आहे पण तो डेव्हलपमेंटनुसार असतो. अमेरिकन लोकांचा मानव धर्म वेगळा आणि आपला मानव धर्म वेगळा.

**प्रश्नकर्ता :** त्यामध्येसुद्धा फरक आहे, दादा? कशाप्रकारे फरक आहे?

**दादाश्री :** खूपच फरक आहे.

आपली ममता आणि त्यांची ममता यात फरक असतो. म्हणजे आई-वडिलांवर आपली जेवढी ममता असते तेवढी त्यांच्यात नसते. ममता कमी असल्यामुळे भावामध्ये फरक होतो. भाव तितका कमी असतो.

**प्रश्नकर्ता :** जेवढी ममता कमी असते तेवढाच भावात फरक पडतो?

**दादाश्री :** त्या प्रमाणातच मानव धर्म असतो. म्हणजे आपल्यासारखा मानव धर्म त्यांचा नसतो. ते लोक तर मानव धर्मातच आहेत. अंदाजे ऐंशी टक्के लोक मानव धर्मातच आहेत. फक्त आपले लोकच नाहीत. बाकी सर्व जण त्यांच्या हिशोबाने तर मानव धर्मातच आहेत.

## मानवतेचे प्रकार वेगवेगळे

**प्रश्नकर्ता :** हा जो मानव समूह आहे त्यांची जी समज आहे मग तो जैन असो, ख्रिश्चन असो, वैष्णव असो, ते तर सर्व ठिकाणी एकसारखेच असतात ना?

**दादाश्री :** असे आहे की जेवढी डेव्हलपमेंट झालेली असेल तेवढी त्याची समज असते. ज्ञानीसुद्धा मनुष्यच आहेत ना?

ज्ञानींची मानवता, अज्ञानीची मानवता, पापी लोकांची मानवता, पुण्यवंतांची मानवता सर्वांची मानवता वेगवेगळी. मनुष्य एकच प्रकारचा आहे तरीसुद्धा.

ज्ञानी पुरुषाची मानवता ही वेगळ्या प्रकारची असते. अज्ञानीची मानवता ही वेगळ्या प्रकारची असते. मानवता सर्वांमध्ये असते, अज्ञानीमध्ये पण मानवता असते. जे अनडेव्हलप्ड (अविकसित) आहेत त्यांची पण मानवता, पण ती मानवता वेगळ्या प्रकारची असते. ते अनडेव्हलप्ड आहेत आणि हे डेव्हलप्ड आहेत. पापीची मानवता म्हणजे जर आपल्याला समोर चोर भेटला तर त्याची मानवता कशी? तो म्हणेल, 'उभे राहा,' तेव्हा आपण समजून जायचे की हीच त्याची मानवता आहे. त्याची मानवता पाहिली ना? तो म्हणेल, 'देऊन टाका.' तेव्हा म्हणावे, 'घे रे बाबा, लवकरात लवकर.' आम्हाला भेटलास हे तर तुझे पुण्यच आहे ना!

मुंबईत असताना तिथे एक माणूस इतका घाबरट होता, तो मला

म्हणाला, 'आजकाल तर या टॅक्सींमधून फिरायलाच नको.' मी विचारले, काय झाले, भाऊ? एवढ्या दहा हजार टॅक्सी आहेत तरी फिरू शकत नाही. असे न फिरायला काय झाले? तसा काही सरकारी कायदा निघाला आहे का? तेव्हा सांगतो, 'नाही, लुटतात टॅक्सीत मारून-बदडून लुटतात.' अरे मूर्खांनो, असे वेड्यासारखे तर्क कुठपर्यंत काढणार तुम्ही? लुटणे हे नियमानुसार आहे की नियमाच्या बाहेर आहे? रोज चार जण लुटले जातात त्यावरून हे बक्षीस तुला लागणार आहे अशी खात्री कशावरून पटली? बक्षीस तर हिशोब असलेल्याला कधीतरी लागते. बक्षीस रोज थोडेच मिळते?

हे ख्रिश्चन पण पुनर्जन्म समजत नाहीत. तुम्ही त्यांना कितीही विचारा की तुम्ही पुनर्जन्म का समजत नाही? तरीही ते ऐकत नाहीत. परंतु आम्ही (ही त्यांची चूक आहे) असे बोलू शकत नाही कारण हे मानव धर्माच्याविरुद्ध आहे. काही बोलल्यामुळे समोरच्याला जरासुद्धा दु:ख होत असेल तर ते मानव धर्माच्या विरुद्ध आहे. तुम्ही त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

## असे चुकलो मानव धर्म

मानव धर्म मुख्य गोष्ट आहे. सर्व मानव धर्म एक समान नाहीत. कारण मानव धर्म ज्यास 'करणी' (कृत्य) असे म्हटले जाते आणि या कारणाने जर एखादा युरोपियन तुमच्याशी मानव धर्म निभावेल व तुम्हीही त्याच्याशी मानव धर्म निभावाल, तरी दोन्हींमध्ये खूपच फरक असेल. कारण त्या मागे त्याची भावना काय असेल आणि तुमची भावना काय असेल? कारण तुम्ही डेव्हलप्ड आहात, अध्यात्म ज्या देशात 'डेव्हलप्ड' (विकसित) झालेले आहे त्या देशाचे तुम्ही आहात. त्यामुळे आपले संस्कार खूपच उच्च कोटीचे आहेत. जर मानव धर्मात आलेला असेल तर आपले संस्कार एवढे उच्च कोटीचे आहेत की त्या संस्कारांना काही सीमाच नाही. परंतु लोभ व लालचेमुळे हे लोक मानव धर्म विसरले

आहेत. आपल्या येथे क्रोध, मान, माया, लोभ 'फुल डेव्हलप्ड' (पूर्ण विकसित) झालेले आहेत. यामुळे येथील लोक मानव धर्म विसरले आहेत पण तरी मोक्षाचे अधिकारी अवश्य आहेत. कारण येथे डेव्हलप्ड झाला तेव्हापासूनच तो मोक्षाचा अधिकारी झाला. पण त्या लोकांना मोक्षाचे अधिकारी म्हणता येत नाही. ते धर्माचे अधिकारी आहेत पण मोक्षाचे अधिकारी नाहीत.

## मानवतेची विशेष समज

**प्रश्नकर्ता :** वेगवेगळ्या मानवतेची लक्षणे जरा विस्ताराने समजवून सांगा.

**दादाश्री :** मानवतेची ग्रेड (दर्जा) वेगवेगळी असते. प्रत्येक देशाची मानवता जी आहे तिच्या विकासाच्या आधारावर सर्व ग्रेड्स असतात. मानवता म्हणजे स्वत:ची ग्रेड नक्की करणे की जर आपल्यात मानवता आणायची असेल तर 'मला जे अनुकूल वाटत आहे तसेच मी समोरच्यासाठी करणार.' आम्हाला ज्या संयोगात अनुकूलता वाटत असेल तसेच अनुकूल संयोग दुसऱ्यांसाठी व्यवहारात आणणे यास मानवता म्हणतात. प्रत्येकाची मानवता वेगवेगळी असते. सर्वांची मानवता एकसारखी नसते, प्रत्येकाच्या ग्रेडेशन प्रमाणे ती असते.

म्हणजे स्वत:ला अनुकूलता वाटत असेल तशीच अनुकूलता सर्वांसाठी ठेवावी. की मला दु:ख होत आहे तर त्याला दु:ख का नाही होणार? आपले काही चोरीला गेले तर आपल्याला दु:ख होते तर कोणाची चोरी करतेवेळी आपल्याला असा विचार आला पाहिजे की 'नाही, कोणाला दु:ख होईल असे का करावे?' कोणी आपल्याशी खोटे बोलत असेल तर आपल्याला दु:ख होते, तेव्हा आपणही कोणासोबत असे करण्याआधी विचार करावा. प्रत्येक देशातील प्रत्येक माणसाचे मानवतेचे ग्रेडेशन वेगवेगळे असते.

मानवता म्हणजे स्वत:ला जे आवडते तसेच वर्तन दुसऱ्यांबरोबर

करणे, ही छोटीशी व्याख्या चांगली आहे. परंतु प्रत्येक देशातील लोकांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे असले पाहिजे.

स्वत:ला जे अनुकूल वाटत नसेल, असा प्रतिकूल व्यवहार दुसऱ्यांबरोबर करू नये. स्वत:ला अनुकूल आहे असेच वर्तन दुसऱ्यांबरोबर केले पाहिजे. जेव्हा मी तुमच्या घरी येतो तेव्हा तुम्ही, 'या, बसा' असे म्हणता आणि ते जर मला आवडत असेल तर जेव्हा माझ्या घरी कोणी आले तेव्हा मी सुद्धा त्यांना 'या, बसा' असे म्हटले पाहिजे, त्यास मानवता म्हणतात. मग आपल्या घरी कोणी आले तेव्हा आपण असे बोललो नाही आणि त्यांच्याकडून ते असे बोलावे अशी अपेक्षा केली तर यास मानवता म्हणता येणार नाही. आपण कोणाच्या घरी पाहुणे म्हणून गेलो असू आणि त्यांनी आपल्याला चांगले खायला घालावे अशी अपेक्षा करतो तर आपल्यालासुद्धा विचार केला पाहिजे की आपल्या घरी जर पाहुणे आले तर त्यांच्यासाठी पण चांगले जेवण बनवावे. अर्थात स्वत:ला जसे हवे असेल तसे दुसऱ्यांबरोबर करावे, त्यास मानवता म्हणतात.

स्वत:ला समोरच्याच्या जागी ठेवून सर्व व्यवहार करणे, ही आहे मानवता. मानवता प्रत्येकाची वेगवेगळी असते. हिंदूंची वेगळी, मुसलमानांची वेगळी, ख्रिश्चनांची वेगळी, सर्वांची वेगवेगळी असते. जैनांची मानवता सुद्धा वेगळी असते.

तसे तर स्वत:चा अपमान झालेला आवडत नाही, पण लोकांचा अपमान करण्यात मात्र शूरवीर असतो, त्यास मानवता कशी म्हणणार? अर्थात प्रत्येक गोष्टींमध्ये विचारपूर्वक व्यवहार करणे याला मानवता म्हणतात.

थोडक्यात, मानवतेची प्रत्येकाची आपापली पद्धत असते. या बाबतीत 'मी कुणालाही दु:ख देणार नाही' ही मानवतेची बाउंड्री (सीमा) आहे आणि ही बाउंड्री प्रत्येकाची वेगवेगळी असते. मानवतेचा असा कोणताही एकच मापदंड नाही. 'ज्यामुळे मला दु:ख होते तसे दु:ख मी

कोणालाही देणार नाही. मला जर कुणी असे दु:ख दिले तर काय होईल? म्हणूनच असे दु:ख मी कुणालाही देणार नाही. स्वत:ची जेवढी डेव्हलपमेंट असेल त्यानुसारच तो करत राहतो.

## सुख मिळते, सुख दिल्यावर

**प्रश्नकर्ता :** आम्ही हे जाणतो की कोणाचेही मन दुखावले जाणार नाही अशा प्रकारे जगले पाहिजे, हे सर्व मानवतेचे धर्म आम्ही जाणतो.

**दादाश्री :** हे तर मानवतेचे धर्म आहेत. मानव धर्माचा अर्थ काय? मानव धर्म म्हणजे आपण समोरच्याला सुख दिले तर आपल्याला पण सुख मिळत राहील. आम्ही जर सुख देण्याचा व्यवहार करू तर व्यवहारात आम्हाला सुख प्राप्त होईल आणि दु:ख देण्याचा व्यवहार करू तर व्यवहारात दु:ख प्राप्त होईल, म्हणून जर आपल्याला सुख हवे असेल तर व्यवहारात सर्वांना सुख द्या आणि दु:ख हवे असेल तर दु:ख द्या. आणि जर आत्म्याचा स्वाभाविक धर्म जाणून घेतला तर नेहमीसाठी सुखच राहील.

**प्रश्नकर्ता :** सर्वांना सुख देण्यासाठी शक्ती प्राप्त व्हावी अशी प्रार्थना करावी ना?

**दादाश्री :** हो, अशी प्रार्थना करू शकतो.

## जीवन व्यवहारात यथार्थ मानव धर्म

**प्रश्नकर्ता :** आता ज्यांना मनुष्याच्या मूळ गरजा म्हणतात, जसे अन्न, पाणी, आराम इत्यादींची व्यवस्था आणि प्रत्येक मनुष्याला आसरा मिळावा यासाठी प्रयत्न करणे हा मानव धर्म म्हटला जातो का?

**दादाश्री :** मानव धर्म ही गोष्टच मुळात वेगळी आहे. मानव धर्म तर इथपर्यंत पोहोचू शकतो की या दुनियेत लक्ष्मीचे (पैशांचे) जे वाटप होते ते नैसर्गिक वाटप आहे. त्यात माझ्या वाट्याचे जे आहे ते

तुम्हाला द्यावेच लागते. त्यामुळे मला लोभ करण्याची गरजच नाही. लोभीपणा राहत नाही, याचे नाव मानव धर्म. पण इतके सर्व तर जमू शकत नाही परंतु काही प्रमाणात जरी मानव धर्म पाळला तरी पुष्कळ झाले.

**प्रश्नकर्ता :** तर याचा अर्थ असा झाला की कषाय रहित होत जाणे, तो मानव धर्म आहे.

**दादाश्री :** नाही, असे जर म्हटले तर मग तो वीतराग धर्मात आला. मानव धर्म म्हणजे बस इतकेच की पत्नीसोबत राहा, मुलांसोबत राहा, अमक्यासोबत राहा, तन्मयाकार व्हा, लग्ने लावा, काहीही करा. या सर्वात कषाय रहित होण्याचा प्रश्नच येत नाही परंतु तुम्हाला जसे दु:ख वाटते तसेच दुसऱ्यांना सुद्धा दु:ख वाटणार असे समजून तुम्ही वागा.

**प्रश्नकर्ता :** हो, पण यात असेच झाले ना की समजा आम्हाला भूक लागते. भूक हे एक प्रकारचे दु:खच आहे. त्यासाठी आमच्याकडे साधन उपलब्ध आहे आणि आम्ही खातो. परंतु ज्याच्याजवळ हे साधन नाही त्यास ते देणे. आम्हाला जे दु:ख होते ते दु:ख दुसऱ्याला होऊ नये असे करणे ही सुद्धा एक प्रकारे मानवताच झाली ना?

**दादाश्री :** नाही. तुम्ही जी मानता ती मानवता नाही. निसर्गाचा नियम असा आहे की तो प्रत्येकाचे भोजन त्याच्यापर्यंत पोहोचवतो. हिंदुस्तानात एकही गाव असे नाही की जिथे कोण्या माणसाला कोणी भोजन देण्यासाठी जात असेल, कपडे देण्यासाठी जात असेल, असे काही नाहीच. हे तर या शहरांमध्येच असे सर्व उभे केले गेले आहे, ही तर व्यापारी पद्धत शोधून काढली आहे त्या लोकांकरिता पैसे गोळा करण्यासाठी. खरे तर अडचण कुठे आहे? तर सामान्य जनतेमध्ये, जी मागू शकत नाही, बोलू शकत नाही, काही सांगू शकत नाही तिथे अडचण आहे. बाकी सर्व ठिकाणी कसली आली आहे अडचण? हे तर उगाचच घेऊन बसले आहेत.

**प्रश्नकर्ता :** असे कोण आहेत?

**दादाश्री :** आपला सामान्य वर्ग असाच आहे. तिथे जा आणि त्यांना विचारा की भाऊ, तुला काही अडचण आहे का? बाकी या सर्व लोकांना, ज्यांच्यासाठी तुम्ही सांगता ना की यांना दान दिले पाहिजे ते लोक तर दारू पिऊन मजा करतात.

**प्रश्नकर्ता :** हे बरोबर आहे. पण तुम्ही जे सांगितले की सामान्य लोकांना गरज आहे तर तेथे दान देणे हा धर्मच झाला ना?

**दादाश्री :** हो, पण त्यात मानव धर्माचे काय देणेघेणे? मानव धर्माचा अर्थ काय की जसे मला दु:ख होते तसे दुसऱ्यालाही दु:ख होते. म्हणून कोणाला दुख होणार नाही अशा प्रकारे वागणे.

**प्रश्नकर्ता :** असेच झाले ना? कोणाकडे कपडे नसतील तर...

**दादाश्री :** नाही हे तर दयाळू माणसाचे लक्षण आहे. बाकीचे सर्व लोक दया कशी दाखवू शकणार? हे तर जो पैसेवाला आहे तोच करू शकतो.

**प्रश्नकर्ता :** सामान्य लोकांना पुरेसे मिळत राहावे, आवश्यकता पूर्ण होत राहाव्या यासाठी सामाजिक स्तरावर प्रयत्न करणे हे योग्यच आहे ना? सामाजिक स्तरावर म्हणजे आम्ही सरकारवर दबाव टाकावा की तुम्ही असे करा, या लोकांना द्या, असे करणे मानव धर्मात येते का?

**दादाश्री :** नाही. हा सर्व चुकीचा इगोइजम (अहंकार) आहे या लोकांचा.

जो समाजसेवा करतो तो लोकांची सेवा करतो असे बोलले जाते, किंवा दया दाखवतो, संवेदना दाखवतो असेही बोलले जाते. परंतु मानव धर्म तर सर्वांनाच स्पर्श करतो. माझे घड्याळ हरवले तर मी असे समजतो की कोणी मानव धर्मवाला असेल तर माझे घड्याळ परत करेल. याउलट

त्या प्रकारची जी सेवा करत आहात ती सर्व कुसेवाच केली जात आहे. एका माणसाला मी विचारले, 'हे काय करता? तुम्ही त्या लोकांना हे कशासाठी देता? असे देतात का? आले मोठे सेवा करणारे! मोठे आले सेवक! काय बघून सेवा करायला निघाले?' हे तर लोकांचा पैसा गैरमार्गी जातोय, आणि तरी लोक देतात सुद्धा.

**प्रश्नकर्ता :** परंतु आज यालाच तर मानव धर्म म्हणतात.

**दादाश्री :** माणसांना संपवून टाकतात. तुम्ही त्यांना जगूसुद्धा देत नाही. मी त्या माणसाला खूप ओरडलो. कसला माणूस आहेस? तुम्हाला हे कोणी शिकवले? असे लोकांकडून पैसे गोळा करायचे आणि तुम्हाला जो गरीब वाटतो त्याला बोलवून ते पैसे द्यायचे, अरे पण याचे थर्मामीटर (मापदंड) काय? हा गरीब वाटला म्हणून त्याला द्यायचे आणि हा गरीब वाटला नाही म्हणून त्याला द्यायचे नाही? ज्याला आपल्या अडचणींचे नीट वर्णन करता आले नाही, जो सविस्तर बोलू शकला नाही, त्याला द्यायचे नाही आणि ज्याला चांगल्या प्रकारे बोलता आले त्याला देऊन टाकायचे. आला मोठा थर्मामीटरवाला! मग त्याने मला म्हटले, आपण मला दुसरा मार्ग दाखवावा. मी म्हणालो, हा माणूस शरीराने मजबूत, धडधाकट आहे तर त्याला तुम्ही हजार-दीड हजाराची हातगाडी विकत घेऊन द्या व रोख दोनशे रुपये देऊन त्याला सांगा की भाजीपाला घेऊन ये आणि विकायला सुरू कर आणि त्याला म्हणावे, हातगाडीचे भाडे म्हणून दर दोन-चार दिवसांनी पन्नास रुपये मला देत जा.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे मोफत द्यायचे नाही, त्याला उत्पादन करण्याचे साधन उपलब्ध करून द्यायचे.

**दादाश्री :** हो, नाहीतर असे तर तुम्ही त्याला बेकार बनवत आहात. संपूर्ण जगात कोणत्याही जागी बेकारी नाही, ही बेकारी तुम्ही पसरवली आहे, या आपल्या सरकारने पसरवली आहे, असे सर्व करून. हे सर्व नाटक वोट मिळवण्यासाठी आहे.

मानव धर्म तर सेफसाइड (सलामती)च दाखवतो.

**प्रश्नकर्ता :** ही गोष्ट खरी आहे की आपण दया दाखवतो त्यामुळे त्या व्यक्तीच्या मनात अशी भावना उत्पन्न होते की तो दुसऱ्यांवर अवलंबून जगत आहे.

**दादाश्री :** त्याला खायला-प्यायला मिळाले की मग तो कोणी दारू ठेवत असेल तेथे जाऊन बसतो आणि खाऊन, पिऊन मजा करतो.

**प्रश्नकर्ता :** दादा, तुमचे खरे आहे, तो पितो. याचा उपयोग अशा प्रकारे होत असतो.

**दादाश्री :** जर असेच असेल ना, तर आपण त्यांना बिघडवू नये. आपण कोणाला सुधारू शकत नाही तर त्याला बिघडवायचेही नाही. ते कसे? तर सेवा करणारे दुसऱ्यांकडून कपडे घेऊन या लोकांना देतात परंतु हेच लोक ते कपडे विकून भांडी घेतात. त्या ऐवजी या लोकांना कामधंद्याला लावा. अशा प्रकारे कपडे देणे, खाण्यास देणे हा मानव धर्म नाही, त्यांना कामधंद्याला लावा.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही सांगता त्या गोष्टी तर सर्वच स्वीकारतात आणि तिथे तर ते फक्त दान देऊन पंगू बनवतात.

**दादाश्री :** त्यामुळेच हा सर्व पंगूपणा आलेला आहे. इतके अधिक दयाळू लोक पण अशी दया करण्याची गरज नाही. त्याला एक हातगाडी विकत घेऊन द्या आणि भाजीपाला द्या. पहिल्या दिवशी विकून येईल, दुसऱ्या दिवशी विकून येईल, त्याचा रोजगार सुरू झाला. असे बरेच मार्ग आहेत.

## मानव धर्माची निशाणी

**प्रश्नकर्ता :** आम्ही आमच्या मित्रांसोबत दादांची ही गोष्ट बोलतो,

तेव्हा ते म्हणतात की 'आम्ही मानव धर्म पाळतो एवढे पुरेसे आहे,' असे बोलून ही गोष्ट टाळतात.

**दादाश्री :** हो, जर मानव धर्म पाळला तर त्याला आम्ही देव म्हणू. जेवण केले, अंघोळ केली, चहा प्यायला यास काही मानव धर्म म्हटले जात नाही.

**प्रश्नकर्ता :** नाही. मानव धर्म म्हणजे लोक काय समजतात की एकमेकांना मदत करणे, कोणाचे भले करणे, लोकांना हेल्पफुल होणे, लोक यालाच मानव धर्म मानतात.

**दादाश्री :** हा काही मानव धर्म नाही. बिचारी जनावरेही आपल्या कुटुंबाला मदत करावी अशी समज ठेवतात.

मानव धर्म म्हणजे प्रत्येक बाबतीत त्याला विचार येतो की माझ्यासोबत जर असे घडले तर काय होईल? असा विचार प्रथम आला नाही तर तो मानव धर्मात नाहीच. कोणी मला शिवी दिली त्यावेळी मी पण त्याला शिवी देईन. परंतु जर त्या आधीच माझ्या मनात असा विचार आला की, 'मलाच जर इतके दु:ख होत आहे तर मी शिवी दिल्यावर त्याला किती दु:ख होईल?' असे समजून समाधान केले तर त्या गोष्टीचा निकाल होईल. तो शिवी न देता समाधान करतो.

ही मानव धर्माची पहिलीच निशाणी आहे. येथून मानव धर्म सुरु होतो. मानव धर्माची सुरुवात येथूनच झाली पाहिजे. सुरुवातच झाली नसेल तर त्याला मानव धर्म समजलाच नाही, असे म्हणावे.

**प्रश्नकर्ता :** मला जसे दु:ख होते तसेच इतरांनाही दु:ख होते हा जो भाव आहे तो भाव जसजसा डेव्हलप होतो तेव्हा मग मानवाची मानवासोबतची एकता अधिकाधिक डेव्हलप होत जाते ना?

**दादाश्री :** ती तर होत जाते. संपूर्ण मानव धर्माचा उत्कर्ष होतो.

**प्रश्नकर्ता :** हो, तो असा सहजच उत्कर्ष होत राहतो.

**दादाश्री :** सहजच होत राहतो.

## पाप कमी करणे तो खरा मानव धर्म

मानव धर्मामुळे तर अनेक प्रश्न सोडवले जातात. पण हा मानव धर्म लेव्हलमध्ये (संतुलनामध्ये) असला पाहिजे. ज्यावर लोक टीका करतात त्याला मानव धर्म म्हणूच शकत नाही. कित्येक लोकांना मोक्षाची आवश्यकता वाटत नाही परंतु मानव धर्माची आवश्यकता तर सर्वांनाच आहे ना! मानव धर्मात आले तर बरीचशी पापे कमी होतात.

## हे समजपूर्वक असावे...

**प्रश्नकर्ता :** मानव धर्मात दुसऱ्यांप्रति आपली अपेक्षा असेल की त्याने सुद्धा असाच व्यवहार केला पाहिजे, तर तो कित्येकदा अत्याचार होऊन जातो.

**दादाश्री :** नाही, प्रत्येकाने मानव धर्मातच राहिले पाहिजे. त्याने असेच वागले पाहिजे असा काही नियम नसतो. मानव धर्म अर्थात स्वतः समजून मानव धर्माचे पालन करण्यास शिकावे.

**प्रश्नकर्ता :** हो, स्वतः समजून! परंतु हा तर दुसऱ्यांनाच सांगतो की तुम्हाला असे वागायला हवे, असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे.

**दादाश्री :** असे सांगण्याचा अधिकार कोणाला आहे? तुम्ही काय गव्हर्नर आहात? तुम्ही असे सांगू शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** हो, म्हणूनच तो अत्याचार होऊन जातो.

**दादाश्री :** त्यास अत्याचारच म्हणायचा, उघड-उघड अत्याचार. तुम्ही कुणावरही सक्ती करू शकत नाही, तुम्ही त्याला समजावू शकता की, असे केलेस तर तुला लाभदायक होईल, तू सुखी होशील. कोणावर सक्ती तर करूच शकत नाही.

## असे उज्ज्वल करावे मनुष्य जीवन

याला माणुसकी कसे म्हणता येईल? दिवसभर खाऊन-पिऊन फिरत राहिले, एका-दोघांना खडसावले आणि मग रात्री येऊन झोपले. याला काय माणूस म्हणायचे? हे तर मनुष्य जीवनास लाजवतात. माणुसकी तर तेव्हाच म्हणायची की संध्याकाळपर्यंत पाच-पंचवीस जणांना सुख-शांती देऊन घरी आले असाल तर! आणि हे वर्तन तर मनुष्य जीवनाला लाजवणारे आहे.

## पुस्तके पोहोचवा शाळा-कॉलेजांपर्यंत

स्वत:ला काय समजून बसले आहेत? म्हणतात, 'आम्ही मानव आहोत. आम्हाला मानव धर्माचे पालन करायचे आहे.' मी म्हणालो, 'हो, नक्की पाळा. समजल्याशिवाय तर पुष्कळ दिवस पाळला परंतु आता यथार्थपणे समजून मानव धर्म पाळायचा आहे.' मानव धर्म तर अति श्रेष्ठ गोष्ट आहे.

**प्रश्नकर्ता :** परंतु दादाश्री लोक तर मानव धर्माची व्याख्या वेगळ्याच प्रकारची देतात. मानव धर्मास अगदी वेगळ्याच प्रकारे समजतात.

**दादाश्री :** हो, कारण यावर कोणतेही चांगले पुस्तकच नाही. काही संत लिहितात परंतु ते पूर्णपणे लोकांना समजत नाही. म्हणून असे असायला हवे की पूर्ण गोष्ट पुस्तक रूपात वाचतील, समजतील तेव्हा त्यांना कळेल की आपण जे काही मानत होतो ते सर्व चुकीचे आहे. या मानव धर्मावर पुस्तक बनवून शाळेत एका ठराविक वयाच्या मुलांना शिकवायला हवे. जागृती असणे ही वेगळी गोष्ट आहे आणि सायकॉलॉजिकल इफेक्ट ही वेगळी गोष्ट आहे. मुले शाळेत हे सर्व शिकली तर त्यांना बरोबर लक्षात राहीलच. कोणाची हरवलेली वस्तू जर त्यांना सापडली तर लगेचच त्यांच्या लक्षात येईल की अरे, माझे जर असे हरवले असते तर मला किती दु:ख झाले असते? तर दुसऱ्यांनाही किती दु:ख होत असेल? बस, हाच सायकॉलॉजिकल इफेक्ट, यात

जागृतीची गरज नाही. म्हणून अशी पुस्तके छापून ती पुस्तके ठराविक वयाच्या मुलांना शाळा-कॉलेजात शिकवणे सुरू केले पाहिजे.

मानव धर्माचे पालन केले तर पुण्य करण्याची गरजच नाही. हे पुण्यच आहे. मानव धर्मावर तर पुस्तके लिहिली गेली पाहिजेत की मानव धर्म म्हणजे नक्की काय? अशी पुस्तके लिहिली गेली तर ती भविष्यात सुद्धा लोकांच्या वाचनात येतील.

**प्रश्नकर्ता :** हो, हे भाऊ वर्तमानपत्रात यावर लेख लिहितील ना?

**दादाश्री :** नाही, ते चालणार नाही. असे लिहिले गेलेले लेख रद्दीत दिले जातात, म्हणून पुस्तकेच छापली गेली पाहिजेत. कोणाजवळ एखादे जरी पुस्तक राहिले असेल तर कोणी पुन्हा छापणारा भेटेल. म्हणूनच मी सांगत असतो की ही सर्व हजारो पुस्तके आणि सर्व आप्तवाणीची पुस्तके वाटत राहा. एखादे जरी पुस्तक मागे राहिले तरी भविष्यातील लोकांचे काम होऊन जाईल. नाहीतरी बाकी सर्व तर रद्दीतच जाणार आहे. लिहिलेला लेख जरी सोन्यासारखा असला तरी दुसऱ्या दिवशी रद्दीत विकून टाकतात आपल्या हिंदुस्तानातील लोक! आत चांगले लिखाण असले तरी तो पान फाडणार नाही, कारण तितकेच रद्दीचे वजन कमी होईल. म्हणून या मानव धर्मावर जर पुस्तक लिहिले गेले...

**प्रश्नकर्ता :** दादाश्रींची वाणी मानव धर्मावर पुष्कळ आहे.

**दादाश्री :** पुष्कळ, पुष्कळ, भरपूर निघाली आहे. आम्ही नीरूबहनला प्रकाशित करण्यास सांगू. नीरूबहनला सांगा ना वाणी एकत्र करून पुस्तक तयार करायला.

मानवता हा मोक्ष नाही. मानवतेमध्ये आल्यानंतर मोक्षाला जाण्याची तयारी सुरू होते. नाहीतर मोक्ष प्राप्त करणे ही काही सोपी गोष्ट नाही.

❖ ❖ ❖ ❖ ❖

## संपर्क सूत्र

### दादा भगवान परिवार


**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे, पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन** : 9328661166, 9328661177
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

| | | | |
|---|---|---|---|
| **दिल्ली** | 9810098564 | **बेंगलूर** | 9590979099 |
| **कोलकता** | 9830080820 | **हैदराबाद** | 9885058771 |
| **चेन्नई** | 7200740000 | **पूणे** | 7218473468 |
| **जयपुर** | 8890357990 | **जलंधर** | 9814063043 |
| **भोपाल** | 6354602399 | **चंडीगढ** | 9780732237 |
| **इन्दौर** | 6354602400 | **कानपुर** | 9452525981 |
| **रायपुर** | 9329644433 | **सांगली** | 9423870798 |
| **पटना** | 7352723132 | **भुवनेश्वर** | 8763073111 |
| **अमरावती** | 9422915064 | **वाराणसी** | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232), **Email :** info@us.dadabhagwan.org
**U.K.** : +44 330-111-DADA (3232)
**Kenya** : +254 722 722 063
**UAE** : +971 557316937
**Dubai** : +971 501364530
**Australia** : +61 421127947
**New Zealand** : +64 21 0376434
**Singapore** : +65 81129229


**www.dadabhagwan.org**

# मानवधर्म अंगीकारा जीवनात

मानवधर्म अर्थात प्रत्येक बाबतीत त्याला विचार येतात की, माझ्यासोबत असे घडले तर काय होईल ? 'कोणी मला शिवी दिली त्यावेळी मी सुद्धा त्याला शिवी देईन, पण त्या आधीच जर माझ्या मनात असा विचार आला की, मलाच जर एवढे दुःख होत आहे तर मी शिवी दिल्यावर त्याला किती दुःख होईल!' असा विचार करून समाधान केले तर त्या गोष्टीचा निकाल होईल. मानवधर्माची सर्वात पहिली निशाणी हीच आहे. इथूनच मानवधर्म सुरु होतो.

म्हणूनच हे पुस्तक छापून, सर्व शाळा-कॉलेजांमध्ये सुरू केले पाहिजे. सर्वकाही पुस्तकाच्या माध्यमातून वाचतील, समजून घेतील तेव्हा त्यांच्या मनाला असे वाटेल की जे काही आपण मानत आहोत, ते सर्व चुकीचे आहे. आता यथार्थपणे समजून मानवधर्म पाळायचा आहे. मानवधर्म तर अति श्रेष्ठ गोष्ट आहे.

-दादाश्री

dadabhagwan.org

ISBN 978-93-86321-02-2

9 789386 321022

Printed in India

Price ₹10